




# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक १२४, मंगळवार २३ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# सुप्यात मराठ्यांचा झंजावात!

## ■ लाखो मराठा बांधव एकवटले ■ जेवण, चहा पाण्याचे चोख नियोजन




■ मनोज जरांगे यांची पदयात्रा कामरगांव शिवारात आल्यानंतर आमदार नीलेश लंके यांनी हजारो समर्थकांसह त्यांचे स्वागत केले.

सुपा : शरद रसाळ, सुदाम दरेकर

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पदयात्रेने मुंबईकडे कुच करणाऱ्या संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या पदयात्रेत सहभागी होण्यासाठी, पदयात्रेतील बांधवांच्या जेवणाची, चहा पाण्याची व्यवस्था करण्यासाठी लाखो मराठा बांधव सोमवारी सुप्यात डेरेदाखल झाले होते.**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे शनिवारी आंतरवली सराटी येथून लाखो मराठा बांधवांसह मुंबईकडे निघाले असून सोमवारी सुपे येथे भोजन घेऊन जरांगे यांची पदयात्रा रांजणगाव गणपती येथे मुक्कामी जाणार आहे.

सोमवारी सकाळपासूनच मराठा बांधव पदयात्रेचे स्वागत करण्यासाठी सुप्यात तळ ठोकून होते. श्रीगोंदे, नगर तसेच पारनेर तालुक्यातील शेकडो मराठा बांधवांनी पदयात्रेतील मराठा बांधवांसाठी जेवणाची, चहापाण्याची व्यवस्था केली होती. दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास ही पदयात्रा सुप्यात पोहचणार होती. मात्र सायंकाळी सात वाजेपर्यंत ही पदयात्रा नगर शहरात मिळालेल्या मोठया प्रतिसादामुळे सुप्यात पोहचली नव्हती.

सुप्याच्या अलिकडेच मराठा बांधवांनी आलेल्या मराठा बांधवांच्या भोजनाची व्यवस्था केली होती. विविध गावांतील नागरीकांनी वेगवेगळया पदार्थांची व्यवस्था करीत प्रत्येकास जेवणाचा आग्रह करण्यात येत होता. विविध प्रकारच्या चटण्या, लोणचे, थालीपीठ, पिठलं भाकरी, लापशी आमटी, पुलाव राईस, फराळाचे पदार्थ, बुंदी तसेच फळांचीही व्यवस्था करण्यात आली होती. बाटलींबंद पिण्याचे पाणी तसेच वैद्यकिय सुविधाही या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी जेसीबीमधून पुष्पवृष्टी करण्यासाठी सकाळपासूनच मराठा स्वयंसेवक प्रतिक्षेत होते. नगर पुणे महामार्गावर लाखो मराठा बांधवांच्या हजेरीमुळे वारंवार वाहतूकीची कोंडी होत होती. नगर तालुका तसेच सुपे पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी वाहतूकीचे नियमन करत होते.

### आ. लंके यांनी केले स्वागत

**मनोज जरांगे हे कामरगांव शिवारात हॉटेल स्माईल स्टोन परिसरात आल्यानंतर आमदार नीलेश लंके यांनी पारनेर-नगर मतदारसंघाच्या वतीने त्याचे स्वागत केले. जरांगे यांचे स्वागत करण्यासाठी दोन्ही तालुक्यातील हजारो लंके समर्थक उपस्थित होते.**

### जरांगे पाटील भिडा !

जरांगे पाटील भिडा, सरकारला शिकवा धडा या गाण्यावर मराठवाडयातून आलेले मराठा बांधव महामार्गावर थिरकताना दिसत होते. सुपे येथे भोजन केल्यानंतर ध्वनीक्षेपकावर गाणी लावत मराठा बांधव मोठया उत्साहात मुंबईकडे कुच करत होते.

### लेझीमचा ठेका


मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी तालुक्यातील विविध गावांमधील लेझीम पथके सुप्यात दाखल झाली होती. लेझीमच्या ठेक्यावर दिवसभर अनेकांनी ठेका धरला होता.

### डीजेचा दणदणाट

भोजनव्यवस्थेच्या ठिकाणी ठिकठिकाणी डीजे लावून तरूणाई मराठा आरक्षणावर तयार करण्यात आलेल्या गाण्यांवर नाच करीत होती. डीजेच्या आवाजामुळे निर्माण होत असलेल्या गोंधळामुळे आयोजकांनी डीजे बंद करण्याच्या सुचना दिल्या.

### आरक्षण घेऊनच परतणार

मराठवाडयातून आलेल्या मराठा बांधवांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. आम्ही मुंबईला निघालोय, मराठा समाजाला आरक्षण घेउनच परतणार असा दृढ विश्वास त्यांच्याकडून व्यक्त करण्यात येत होता. पारनेर, श्रीगोंदे तालुक्यातील समाज बांधवांनी केलेल्या सेवेप्रती यात्रेतील मराठा बांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली.



# आजपासून कालचक्र बदललं.. राम मंदिर उभारलं, आता पुढे काय?

## पंतप्रधान मोदींनी सांगितला पुढचा प्लॅन

अयोध्या : वृत्तसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येत रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली. यावेळी देशभरातून अनेक मान्यवरांची विशेष उपस्थित होती. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमानंतर बोलताना नरेंद्र मोदी यांनी, राम मंदिर उभारलं, पुढे काय करायचं? असं म्हणत पुढची दिशा स्पष्ट केली.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज रात्री घरोघरी रामज्योती प्रज्वलित होणार आहे. आज देशामध्ये दिवाळी साजरी होत आहे. काल मी श्रीरामांच्या आशीर्वादाने रामसेतूच्या आरंभ बिंदूवर होतो. जेव्हा प्रभू राम समुद्रपार करण्यासाठी निघाले होते. जो एक क्षण होता ज्याने कालचक्राला बदललं होतं.. त्या क्षणाला अनुभवण्याचा माझा प्रयत्न होता.

मी तिथे पुष्पवंदना केली. माझ्या अंतरंगात एक विश्वास जागा झाला. त्याकाळी जसं कालचक्र बदललं होतं तसंच आजही बदलणार आहे आणि शुभदिशेकडे जाणार आहे. मी ११ दिवसांच्या व्रत काळामध्ये तिथे गेलो जिथे-जिथे प्रभू श्रीरामांचा चरणस्पर्श झालेला आहे. सागरापासून शरयूपर्यंत यात्रा करण्याचा अनुभव मला मिळाला आहे.

मोदी पुढे म्हणाले की, प्रभू राम भारताच्या आत्म्यासोबत जोडलेले आहेत. हाच खरा एकतेचा धागा आहे. मला देशाच्या कोनाकोपऱ्यातून रामायण ऐकण्याचा भाग्य मिळालेलं आहे. प्रत्येक युगात लोकांनी रामाला जगलं आहे. आपापल्या शब्दात आणि आपापल्या तऱ्हेने रामाला अभिव्यक्त केलं आहे.

उर्वरीत पान ३ वर

# पारनेर तालुका श्रीराममय!

## तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन




पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यात श्रीराम प्राणप्रतिष्ठापणा सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.पारनेर शहरात श्रीराम प्राणप्रतिष्ठाणा निमित्त मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते , यामध्ये श्रीराम भगवानाची १५ फुटी मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती या मिरवणुकीत आबाल वृद्धांसह महिलांनी मोठा प्रतिसाद दिला होता या मिरवणुकीत तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन पारनेर शहरातील मुख्य बाजारपेठेतून मुख्य चौकात ठिकठिकाणी महाआरतीच्या आयोजन करण्यात आले होते ही मिरवणूक पुढे जात असताना या प्रत्येक चौकात मोठ्या प्रमाणात महाआरतीचे आयोजन करण्यात आले या मिरवणुकीत मुख्य चौकात सर्वच भावी भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.**

या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त संपूर्ण पारनेर शहर दिवाळीत होणाऱ्या सोहळ्यासारखे सजविण्यात आली होती पूर्ण शहर श्रीरामाच्या भगव्या झेंडांनी भगवामय झाली होती प्रत्येक घरासमोर रांगोळ्या सडा टाकून या मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले तसेच शहरातील महिलांनी या मिरवणुकीवर पुष्पवृष्टी करून आपला सहभाग नोंदवला.या निवडणुकीनंतर पारनेर शहरातील श्रीराम मंदिरात महाआरतीच्या आयोजन करून आयोजित होणाऱ्या प्राणप्रतिष्ठांना सोहळ्याच्या महाआरतीच्या वेळीच महाआरती करण्यात आली यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच तालुक्यातील सुपा.काकणेवाडी, वडगाव सावताळ, तराळवाडी, कान्हुर पठार ,बुगेवाडी , निघोज, अळकुटी व उर्वरीत पान ३ वर














# टेकझोन

## ॲमेझॉन करणार फूड डिलीव्हरी


स्विगी, झोमॅटो आणि उबेर इट्स या फूड डिलीव्हरी कंपन्यांच्या शर्यतीत आता ॲमेझॉनही उतरली आहे. किरकोळ व ई-विक्री क्षेत्रातील आघाडीची कंपनी ॲमेझॉन आता फूड डिलीव्हरी क्षेत्रात एन्ट्री करणार आहे. भारतात ऑनलाइन फूड सर्व्हिसचा व्यापार वाढत आहे. ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात या ॲप्सचा वापर केला जातो. एका अहवालानुसार ऑनलाइन जेवण ऑर्डर करणाऱ्यांच्या संख्येत १७६ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळं ॲमेझॉनही या क्षेत्रात उतरली आहे. ॲमेझॉन उद्योजक नारायण मूर्ती यांच्या कॅटामारन कंपनीसोबत भागीदारी करणार असल्याचं बोललं जात आहे. दुसरीकडे ॲमेझॉन उबेर इट्स खरेदी करणार असल्याची चर्चा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ॲमेझॉननं या नवीन व्यवसायासाठी कर्मचाऱ्यांची भरती करण्यास सुरुवात केली आहे. सप्टेंबर महिना हा सण- उत्सवाचा असतो. हेच लक्षात घेऊन ॲमेझॉननं नव्या व्यवसायाचा श्रीगणेशा करण्यासाठी सप्टेंबर महिना निवडला आहे.




# truecaller किती सुरक्षित?

**अनोळखी क्रमांकावरून आलेला कॉल... त्यातून तो कामाचा असेल तर ठीक ... अन्यथा मनस्तापाशिवाय हाती काहीच लागत नाही. त्यातही हल्ली कॉल सेंटर आणि टेलिमार्केटिंगच्या कॉल्सचा सुळसुळाटच झाला आहे... या सर्व अजब परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आपण ट्रू कॉलर नामक ॲपचा पर्याय आजमावतो आणि निर्धास्त होतो. मात्र, एका बातमीने ट्रू कॉलर वापरणाऱ्यांच्या पोटात गोळा आणला आहे. ट्रू कॉलरवर ग्राहकांनी दिलेली सर्व माहिती हॅक झाल्याची ही बातमी होती. या पार्श्वभूमीवर हा नक्की प्रकार काय आहे, याचा घेतलेला वेध...**

कोणताही अनोळखी मोबाइल वा दूरध्वनी क्रमांक शोधायचा असल्यास आपण सगळेच संबंधित क्रमांकावरून नाव शोधणारे ॲप वापरतो, ते म्हणजे ट्रू कॉलर. ट्रू कॉलरवर एखादा मोबाइल क्रमांक शोधला असता, तो मोबाइल किंवा लँडलाइन क्रमांक कोणत्या कंपनीचा आहे, तसेच तो क्रमांक साधारण कोणाचा आहे हे समजते. ट्रू कॉलरचे ॲपही आहे आणि वेबसाइटही. संबंधित क्रमांक वेबसाइटवरूनही शोधता येऊ शकतो.



## ट्रू कॉलर नक्की काय काम करते?

अनोळखी क्रमांक शोधून त्या क्रमांकाची साधारण माहिती मिळवणे, यासाठी ट्रू कॉलर वापरले जाते. त्यासाठी आधी ट्रू कॉलरच्या मदतीने शोध घेऊ इच्छिणाऱ्या युजरला सर्वप्रथम या ॲपवर स्वतःचे रजिस्ट्रेशन करावे लागते. त्यात नाव, क्रमांक आणि ई-मेल आयडी देणे गरजेचे असते. त्याशिवाय आपण आपल्या गावाचे नाव, काय काम करतो, कुठे काम करतो, इत्यादी स्वतःबद्दलची पर्यायी माहिती टाकू शकतो. तसेच इतर साईट्स प्रमाणे स्वतःचा फोटोही टाकू शकतो. पण नक्की ट्रू कॉलरवर क्रमांक शोधला की त्या क्रमांकाची माहिती येते कुठून, हा प्रश्न अनेक जणांना पडलेला असतो. दोन उत्तरे आहेत. एक, जे युजर स्वतःच्या क्रमांकाची नोंदणी करतात त्यांचे नाव, क्रमांक आणि ई-मेल आयडी ट्रू कॉलरकडे साठवले जातात आणि जेव्हा कधी कोणी तो क्रमांक सर्च करेल तेव्हा नोंदणी केलेले नाव दिसते, तसेच युजरने आधी पुरवलेली अन्य माहिती उपलब्ध होते. असे अनेक लोक आहेत ज्यांनी कधीच ट्रू कॉलर वापरले नाही किंवा त्यावर नोंदणी केलेली नाही. तरीही त्यांचे नाव व क्रमांक ट्रू कॉलरकडे असतात. त्याचे कारण असे की ज्या लोकांनी ट्रू कॉलरवर नोंदणी केलेली आहे, त्यांच्या वैयक्तिक माहितीबरोबरच ट्रू कॉलरने त्या युजरच्या मोबाइलमधील सर्व कॉन्टॅक्टस्‌सुद्धा साठवून घेतलेले असतात. या गोष्टीची युजरला माहितीच नसते. याच कारणामुळे अनेकदा ट्रू कॉलरवर काही क्रमांक अगदी घरगुती नावांनी किंवा विचित्र नावांनी आलेले दिसतात, कारण ट्रू कॉलर वापरणाऱ्या कोणत्या तरी युजरने तो क्रमांक त्या विशिष्ट नावाने सेव्ह केलेला असतो.

## काय उपाययोजना करता येतील?



- ट्रू कॉलरवर अगदी गरज असेल तरच नोंदणी करावी. केल्यास अगदी थोडक्यात नाव टाकावे. पूर्ण नाव टाकू नये.
- ई-मेल आयडी, फोटो, नोकरी, पत्ता आणि इतर काही माहिती टाकणे कटाक्षाने टाळावे.
- कधीच ट्रू कॉलर वापरले नसल्यास, एकदा ट्रू कॉलरवर आपला क्रमांक टाकून सर्च करून बघावे.
- जर काही विचित्र किंवा चुकीचे नाव आल्यास नोंदणी न करताही ते नाव एडिट करता येण्याची सुविधा उपलब्ध आहे. तिचा वापर करावा.

## डेटा सुरक्षित का नाही?

ट्रू कॉलरवर अनेक तज्ज्ञांनी ताशेरे ओढले आहेत आणि ट्रू कॉलर वादात सापडतो आहे. ट्रू कॉलरवरील लोकांचा अफाट डेटा विकला जातो आहे. ट्रू कॉलरच्या जगभरातील वापरकर्त्यांपैकी ७० टक्के भारतीय आहेत. जवळपास १४ कोटींपेक्षा जास्त लोकांची माहिती असलेला डेटा अगदी नाममात्र पैशात विकला जातो आहे. डार्क वेबमध्ये या डेटाला प्रचंड मागणी असून, ट्रू कॉलरने देखील हे मान्य केले आहे. परंतु, आपल्या स्पष्टीकरणात ट्रू कॉलरने हा डेटा ट्रू कॉलरने विकलेला नसून, ट्रू कॉलरच्या काही वापरकर्त्यांनीच विकला आहे, असे म्हटले आहे. त्यामुळे ही डेटाविक्री अद्यापही सुरूच आहे. ट्रू कॉलरमध्ये जे प्रीमियम मेंबर युजर आहेत, त्यांना या अकाउंटसाठी काही रक्कम भरावी लागत असली तरी त्याचा एक फायदा आहे. एरवी तुम्ही क्रमांकावरून नाव फुकट शोधू शकता, पण जर तुम्हाला नावावरून क्रमांक शोधायचा असेल तर? पैसे भरून प्रीमियम मेंबर झाल्यावर ट्रू कॉलरवर आपण कोणतेही नाव टाकून क्रमांक मिळवू शकतो. काही भामट्यांनी प्रीमियम युजर बनत, सर्व नावे आणि क्रमांक मिळवले आहेत. यात केवळ नाव व क्रमांकच नाही तर ई-मेल आयडी, नोकरीचे ठिकाण, पत्ता आणि फोटो ही माहितीसुद्धा मिळवता येऊ शकते. या प्रचंड माहितीचा खूप मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ शकतो. आर्थिक किंवा बँकिंग व्यवहारात या माहितीचा दुरुपयोग केला जाऊ शकतो.

## चांगला उपयोग कसा केला जातो?

अनोळखी क्रमांक शोधणे, ब्लँक कॉल किंवा धमकीचे फोन आले, कोणी त्रास देत असेल तर ते क्रमांक शोधण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून ट्रू कॉलर उत्तम आहे. तसेच अनेकवेळा एखाद्या क्रमांकाची विश्वासार्हतासुद्धा यावरून ठरवली जाते. जर एखाद्या व्यावसायिकाचा क्रमांक ट्रू कॉलरवर त्याच नावाने असेल, तसेच त्यासोबत फोटो, ई-मेल आणि इतर संबंधित माहिती असेल, तर त्याच्याविषयी विश्वास निर्माण होतो. ट्रू कॉलरने यूपीआयद्वारे पैसे पाठवण्याची सुविधासुद्धा भारतीय युजर्सना दिली आहे. ट्रू कॉलरमध्ये प्रीमियम युजर असा एक प्रकार आहे, ज्यात महिन्याला काही रक्कम भरावी लागते. ज्यामुळे तो युजर प्रीमियम युजर आहे, हे इतर लोकांना समजते. तसेच एक गोल्ड युजर प्रकार आहे, ज्यामुळे समोरच्या व्यक्तीचे नाव सोनेरी अक्षरात लोकांना दिसते. हे केवळ एक दिखाव्याचा प्रकार आहे, त्यासाठी वर्षाकाठी ६ हजार रुपये मोजावे लागतात.

## दुरुपयोग कसा केला जातो?

अनेकवेळा काही भामटे लोक किंवा गैरव्यवहार करणारे लोक नोंदणी करताना खऱ्या नावाचा वापर करत नाहीत. जाणीवपूर्वक चुकीचे किंवा खोटे नाव वापरले जाते, जेणेकरून कोणी शोध घेतलाच तर आपली खरी ओळख समोर येऊ नये. याची काही उदाहरणे अशी...

- आपण पोलिस आहोत अशी बतावणी करण्यासाठी ट्रू कॉलरवर पोलीस मुख्यालय अधिकारी या नावाने नोंदणी करून लोकांना गंडा घालणारे काही भामटे आहेत. हे भामटे अशा लोकांना फोन करतात, ज्यांच्या व्यवहारात काही ना काही काळेबेरे आहे. आपण पोलिस असल्याचे सांगत त्यांच्याकडून पैसे मागितले जातात.
- अशाच पद्धतीने बँक अधिकारी, वकील, डॉक्टर इत्यादी अनेक नावाने नोंदणी करून लोकांना फोन केले जातात. ट्रू कॉलरवर तत्सम खोटे नाव आल्यामुळे समोरचा माणूस विश्वास ठेवतो आणि फसतो.
- मॅट्रिमोनिअल साईट्सवर असेच काही भामटे खोट्या नावाने वावरतात आणि ट्रू कॉलरवरही त्याच खोट्या नावाने नोंदणी करतात. याप्रकारे अनेक विवाहेच्छुकांची फसवणूक झाली आहे.




## एनीडेस्कद्वारे मोबाइल हॅकिंग

आयुषी आणि तिच्या मैत्रिणीने मणिकर्णिका चित्रपट पहायला जाण्याचा बेत आखला. आयुषीने त्यासाठी बुक मायशो ॲप वापरून दोन तिकिटे बुक केली आणि पेटीएम वॉलेटवरून पेमेंट केले. पण काय गडबड झाली ते कळले नाही, तिकिटे बुक झाली नाहीत. मात्र वॉलेटमधून पैसे डेबिट झाले. आयुषी अस्वस्थ झाली. तिने बुकमायशोच्या कम्प्लेंटसाठीचा मोबाइल नंबर गुगलवरून शोधून काढला आणि डायल केला. सगळी घटना सविस्तरपणे फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीला आयुषीने सांगितली. त्याने तिला एनीडेस्क नावाचे ॲप इन्स्टॉल करण्यास सांगितले. ॲप इन्स्टॉल केल्यानंतर एक नऊ आकडी ओटीपी नंबर येईल तो आयुषीने याच मोबाइल नंबरवर कळवावा, असेही त्याने सांगितले. त्याप्रमाणे आयुषीने एनीडेस्क इन्स्टॉल करून आलेला ओटीपी त्या व्यक्तीला कळवला. त्यानंतर तिच्या मोबाइलवर ग्रँट परमिशन? एस/नो असा मेसेज आला. त्या मेसेजला उत्तर म्हणून तिने एस हा पर्याय निवडला. पाचच मिनिटांत तिच्या सॅलरी अकाऊंटमधून चाळीस हजार रुपये तिच्याच फोनवरील पेटीएम हे यूपीआय ॲप वापरून काढून घेण्यात आले...

एनीडेस्क हे रिमोट डेस्कटॉप ॲक्सेस करण्यासाठी असलेले ॲप



आहे. म्हणजे समजा तुम्ही ऑफिसला आहात आणि तुम्हाला घरच्या कम्प्युटरवरील एखादी फाइल हवी आहे तर या ॲपद्वारे ती फाइल तुम्ही मिळवू शकता. तसे हे ॲप फार उपयोगी आहे. पण हॅकर्स याचा दुरुपयोग करतात आणि तुमच्या मोबाइलचा पूर्ण ताबा मिळवण्यासाठी याचा वापर करतात. एनीडेस्क इन्स्टॉल करून आलेला ओटीपी तुम्ही कोणाला दिला आणि त्यानंतर आलेला ॲक्सेस परमिशन मागण्यासाठीचा मेसेज स्वीकारला तर त्या व्यक्तीला तुमचा फोन पूर्णपणे ॲक्सेस करता येईल म्हणजे तुमच्या फोनचा पूर्णपणे ताबा घेता येईल. त्याद्वारे ती व्यक्ती म्हणजे हॅकर फोनवरील इतर ॲप्सने साठवलेल्या डेटाची चोरी करते. या घटनेत आयुषीने गुगलवरून शोधलेला बुक माय शोचा कम्प्लेंट मोबाइल नंबर फेक होता. तो तिने खरा समजून बोलणाऱ्या व्यक्तीवर विश्वास



ठेवून त्याच्याशी ओटीपी शेअर केला. त्यामुळे तिचा मोबाइल हॅक झाला. एनीडेस्कद्वारे त्या हॅकरने पेटीएममध्ये स्टोअर असलेले डेबिटकार्ड डिटेल्स वापरून पेटीएममार्फतच ट्रान्जॅक्शन घडवून आणले आणि आयुषीच्या सॅलरी अकाउंट मधून पैसे डेबिट झाले.

### वापरकर्त्यांनी हे लक्षात ठेवावे...

- इंटरनेटवरील सर्वच टोल फ्री किंवा मोबाइल नंबर खरे असतातच असे नाही. ते हॅकर्सने तुमची दिशाभूल करण्यासाठी टाकलेले असू शकतात.
- कोणाही व्यक्तीसोबत कुठलाही ओटीपी किंवा पिन शेअर करू नये.
- आपले कार्ड डिटेल्स कुठेही सेव्ह करून ठेवू नये. अगदी खात्रीच्या यूपीआयमध्येही नाही.
- ज्या बँक अकाऊंटच्या द्वारे ऑनलाइन ट्रान्झेक्शन करत असाल त्यात गरजेपुरतेच पैसे ठेवावे.
- कमीत कमी ॲप्स आपल्या मोबाइलमध्ये वापरावे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेने एनीडेस्क ॲप वापरू नका, अशी ग्राहकांना सूचना दिली आहे.

## 'मोह' जाल!

प्रियांका एक मध्यमवर्गीय मुलगी उच्च शिक्षणासाठी मुंबईत वनरूम फ्लॅटमध्ये राहणारी. कॉलेज, क्लासनंतर उरलेल्या वेळात विरंगुळा म्हणून तिला चॅटिंगचा नाद लागला. चॅटिंग करता करता राहुलशी तिची ऑनलाइन भेट, मैत्री झाली. म्हणजे त्याने तरी त्याचे नाव राहुल असे सांगितले. पुढे पुढे त्याच्याशी चॅटिंगचे तिला एवढे व्यसन जडले की ती आपला लॅपटॉप आणि इंटरनेट कनेक्शन कायम ऑन मोडवर ठेवू लागली. तिला जेव्हा वेळ मिळेल, तेव्हा ती राहुलशी चॅटींग करत असे. एक दिवस राहुलने तिला चॅट विंडोमध्ये एक लिंक पाठवून त्याचा पर्सनल ऑनलाइन अल्बम बघण्यास सांगितले. अल्बममधील राहुलचे फोटो बघून ती अधिकच प्रभावित झाली. पुढच्या चॅटिंगच्या वेळेस तिने राहुलला समक्ष भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. आपण बाहेरगावी जात आहोत, असे सांगून राहुलने तिला टाळले. त्या दिवशीपासून तिच्या एक गोष्ट लक्षात आली की तिचा लॅपटॉप प्रोसेसिंगसाठी जास्त वेळ घेत आहे. राहुलशी तिचे चॅटिंग चालूच होते, पण समक्ष भेटण्याची इच्छा जाहीर केल्यास तो काही करून टाळत होता. बऱ्याचदा वेबकॅम ऑन करून ती त्याच्याशी चॅट करत असे. तो मात्र आपल्या लॅपटॉपचा वेबकॅम खराब झाला आहे, असे सांगत असे. असे पाच सहा महिने लोटले. प्रियांकाचा कोर्सही पूर्ण झाला. तिने नोकरीसाठी अप्लाय करायला सुरुवात केली. एका कंपनीकडून तिला नोकरीसाठी इंटरव्ह्यू कॉल आला. पूर्ण तयारीनिशी ती




इंटरव्ह्यूला हजर झाली. इंटरव्ह्यू घेणारा मध्यमवयीन व्यक्ती तिच्याकडे विचित्र नजरेने पाहत होता. इंटरव्ह्यू अपेक्षेपेक्षा छान झाला. बहुतेक सर्व प्रश्नांची उत्तरं प्रियांकाने बरोबर दिली. आता ही नोकरी आपल्यालाच मिळणार, अशी तिला खात्री वाटू लागली. चार दिवस तिने वाट पाहिली. पाचव्या दिवशी तिने त्या कंपनीला फोन करून चौकशी केली. इंटरव्ह्यू घेणाऱ्या व्यक्तीने तिला समक्ष भेटण्यास बोलावले. त्याने तिला जे सांगितले, त्यामुळे तिला जबरदस्त धक्का बसला. कशीतरी ती आपल्या फ्लॅटवर आली. त्या माणसाचे शब्द वारंवार तिच्या डोक्यात घणाघात करत होते. तू हुशार, स्मार्ट आहेस, पण पोर्न साइटस्‌वर वारंवार दिसणाऱ्या मुलीला आम्ही नोकरी देऊ शकत नाही...

एक एक संदर्भ तिच्या लक्षात येऊ लागला. राहुलचे समक्ष भेटण्यास टाळाटाळ करणे,



तिला पाठवलेले लिंक क्लिक करताच लॅपटॉपचे प्रोसेसिंग स्लो होणे... एक एक धागा जुळत गेला. विचार करून मेंदूचे तुकडे पडायला आले. गुगलवर सर्च केल्यावर तिच्या विचारांना पुष्टी मिळाली. तिने गुगलवर सर्च करून सायबर सिक्युरिटी कन्सल्टंटचा नंबर मिळवला आणि त्याला भेटायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी ती सायबर सिक्युरिटी कन्सल्टंटच्या ऑफिसमध्ये आपल्या लॅपटॉपसोबत हजर झाली. त्याने सुमारे अर्धा तास लॅपटॉप आणि चॅटस्‌चे डिटेल्स बघून, आपल्या जवळील अँटी व्हायरस, अँटी स्पायवेअर आणि इतर



सॉफ्टवेअर वापरून, काही ठोकताळे मांडून तिला सांगितले की राहुलने तिला चॅटिंग करताना जी लिंक पाठवली होती ती त्याच्या ऑनलाइन अल्बमची तर होतीच पण त्याचबरोबर ट्रोजन लिंकही होती. ट्रोजन हा व्हायरससारखाच छुपा प्रोग्रॅम असून, जास्त पॉवरफुल असतो म्हणजे तो तुमच्या लॅपटॉपचा वेबकॅमसुद्धा ऑटोमॅटिकली ऑन करू शकतो. ट्रोजनचं डिटेक्शन अँटीव्हायरस लगेच करतो. पण प्रियांकाच्या लॅपटॉपमध्ये अँटीव्हायरस, अँटी स्पायवेअर काहीही नव्हते. प्रियांकाच्या एक एक गोष्ट लक्षात येऊ लागली वनरूम फ्लॅट त्यात आपला लॅपटॉप इंटरनेटसह कायम ऑन असणे, राहुलशी वेबकॅम ऑन करून मारलेल्या गप्पा... तिच्या हाता पायातले त्राण गेल्यासारखे झाले. तिचे फोटो आणि तिच्या ॲक्टिव्हिटीज रेकॉर्ड करून त्यांच्याशी फोटो एडिटर वापरून छेडछाड करून त्याने तिचे पोर्न फोटोज्‌ आणि व्हिडिओज्‌ बनवून तसल्या साइटस्‌वर अपलोड केले होते. हे फारच धक्कादायक होते. शहर पोलिस सायबर सेलला तिने रीतसर कम्प्लेंट नोंदवली. आज या घटनेला दोन वर्षे झाली पण राहुल अजूनही पोलिसांना सापडलेला नाही. कारण सायबर क्राईम करणारे स्वतःचा ट्रेस लागू न देण्याची खबरदारी जरूर घेतात. तेव्हा मित्रमैत्रिणींनो सावध, सतर्क रहा. अनोळखी लोकांशी कधीही चॅट करू नका. कुठलीही लिंक ओपन करु नका. चांगले इंटरनेट सेक्युरीटी अँटीव्हायरस आपल्या संगणकावर, लॅपटॉप वर जरूर ठेवा.

## शॉर्ट न्यूज

### खर्डा येथील डांबरीकरण रस्त्याचे कामपूर्ण

**खर्डा :** आमदार रोहित पवार यांच्या प्रयत्नातून व सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत खर्डा व जामखेड शहराजवळील रस्ता रुंदीकरण रस्ता दुभाजक व डांबरीकरण या कामासाठी पंधरा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. जामखेड शहरा जवळील रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, तसेच खर्डा येथील ऐतिहासिक खर्डा किल्ला ते सिताराम गडाच्या पायथ्यापर्यंत रस्त्याचे काम व रस्ता रुंदीकरण हे काम पूर्ण झाले होते.

### शिबलापूर शिवारात बिबट्या जेरबंद

**संगमनेर :** तालुक्यातील शिबलापूर शिवारात दहशत निर्माण करणाऱ्या बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. शिबलापूर शिवारातील चाळशी परिसरात बिबट्याने धुमाकूळ घालत शेतकऱ्याच्या पशुधनावर हल्ले केल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसान केले होते. दरम्यान वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला.

### बांगर्डे येथे भरदिवसा घरफोडी

**श्रीगोंदा :** तालुक्यातील बांगर्डे शिवारात भरदिवसा घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख १५ हजार रुपयांचा चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी हरिभाऊ हौसराव शेळके (वय ४८) यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरिभाऊ शेळके हे बांगर्डे शिवारातील राहत्या घराला कुलुप लावून कुटुंबियांसह शेतात गेले होते. घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोहर खिळदकर करीत आहेत.

### संग्राम जगताप यांच्या कामाचे कौतुक

**नगर :** शहराचे आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या कमी वयामध्ये सर्वांना बरोबर घेऊन सामाजिक, विकसनशील, व आरोग्याचे कार्य उत्कृष्ट पद्धतीने केले असून कोरोना महामारीच्या काळामध्ये आमदार संग्राम जगताप यांनी आपला जीव धोक्यात घालून नागरिकांना आरोग्याच्या सुविधा पुरविण्याचे काम केले आहे, तसेच नगर शहरात सुरू असलेल्या विकास कामामुळे आमदार संग्राम जगताप यांचे राजकीय भविष्य उज्वल असेल पक्षीय मतभेद बाजूला ठेवून समाज हितासाठी काम करत राहणे गरजेचे आहे या माध्यमातून एकमेकांमध्ये ऋणानुबंध निर्माण होत असतो.

### तपासणी शिबिराला महिलांचा प्रतिसाद

**गोविंदपूरा :** येथील बीसीएफआय एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने संस्थेचे संस्थापक हजरत सय्यद मोहसीन अली शाह यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत स्त्री रोग तपासणी शिबिर आज घेण्यात आले. या शिबिरास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना निरोगी आरोग्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. हजरत सय्यद मोहसीन अली शाह म्हणाले की, संस्थेच्या माध्यमातून धार्मिक शिक्षणाबरोबरच महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# शिरूरच्या कापड बाजारात पैठणीचा तोरा!

**■ फॅशनच्या बदलत्या ट्रेण्डमध्ये युवतींची पैठणीला पसंती**
**■ पैठणीच्या विक्रीत मोठी वाढ झाल्याची कापड विक्रेत्यांची माहिती**

**शिरुर : सतीश डोंगरे**



**महाराष्ट्राचं राजवस्त्र मानल्या गेलेल्या मराठमोळ्या पैठणीची क्रेझ दिवसेंदिवस वाढतच आहे. फॅशनच्या असंख्य क्षेत्रात पैठणीने शिरकाव केला आहे. पैठणीच्या नखऱ्यांनी आता शिरुरची बाजारपेठ ही काबीज केली आहे. यंदाच्या संक्रांत सणाला तर शिरुरच्या कापड बाजारात पैठणीला मोठी मागणी होती, अशी माहीती कापड व्यावसायिकांनी दिली. अलिकडच्या काही वर्षांत सणवार, सांस्कृतिक कार्यक्रम, लग्न समारंभ, विविध उत्सवामध्ये महिला हौसेने पैठणी परिधान करून सहभागी होताना दिसत आहेत. दुसरीकडे एरवी वनपिस किंवा जिन्स घालणाऱ्या युवती ही आता आवडीने पैठणीकडे वळल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेकजणी पैठणीपासून ड्रेसही शिवून घेत आहेत. त्यातून पैठणीला मागणी वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.**

आजकाल तरुणींमध्ये फॅशन म्हणून पैठणी परिधान करण्याचा ट्रेंड सुरु आहे. कुर्ता, जाकीट, धोती, घागरा, ओढणी, ब्लाऊज, वनपीस अशा अनेक कपड्यांबरोबर पैठणीही पुन्हा कात टाकत आहे. पुन्हा नववैभव, नवचैतन्य प्राप्त करत आहे. शुद्ध रेशीम व जर वापरून तयार होणाऱ्या ओरिजिनल पैठणीचा रुबाब वाढताना दिसत आहे. काही वर्षांपासून कोणत्याही सणांना स्टायलिश, हटके लुक कसा करता येईल? आपण इतरांपेक्षा कसे वेगळे दिसू याकडे सगळ्यांचा कल दिसून येत आहे, आपल्याकडे पारंपरिक पैठणी, खण, इरकल यांची आवड आणि मागणी काळ बदलला तरी अजूनही तशीच आहे. हे पारंपारिक फॅब्रिक मुख्यतः साडीत जास्त लोकप्रिय आहे. मात्र आता साडी, कुर्ते याबरोबरीनेच वेस्टर्न पॅटर्नमध्ये या फॅब्रिकला तरुण-तरुणांकडून अधिक पसंती मिळते आहे.

पैठणी, खण आणि इरकल फॅब्रिकमध्ये जॅकेट, ड्रेस, पँट्स, वन पीस विविध दुकानांमधून उपलब्ध आहेत. सणांच्या दिवशी हटके, पण संस्कृतीला धरून पेहराव करण्याचा ट्रेण्ड दिवसेंदिवस वाढतो आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत सणांच्या दिवशी मुली साडी आणि मुलांमध्ये कुर्ता एवढीच फॅशन होती. पण काळानुसार हा फॅशन ट्रेण्ड झपाट्याने बदलत जाताना दिसतो आहे. खण, पैठणीपासून सुंदर ड्रेसेस बनवणारे अनेक लेडीज टेलर शिरूर शहरात आहेत.

महाराष्ट्रातील भरजरी वस्त्रकलेचा उत्कृष्ट पारंपरिक प्रकार म्हणून पैठणीची ओळख आहे. पैठणी ही गर्भरेशमी असून तिचा पदर संपूर्ण जरीचा आणि काठ रुंद आणि ठसठशीत वेलबुट्टीचे असतात.

### बदलते फॅशन युग आणि पैठणीची क्रेझ !

**पूर्वी पैठणी महिलांमध्ये फक्त लग्नकार्यामध्येच दिसून येत होती. परंतु आता पैठणीला मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. अलीकडच्या काळात पैठणीच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आमच्या दुकानात महिन्याकाठी सरासरी ८० ते ९० पैठणी साड्यांची विक्री होते. शहरातील इतर सर्व दुकाने मिळून हा आकडा खूप मोठा आहे.आमच्याकडे बनारस सुरत बेंगलोर आदी ठिकाणाहून पैठणी येते. पैठणी वरील विणकाम, वस्त्राचा पोत, रंगसंगती, नक्षीकाम यावर पैठणीच्या किंमती अवलंबून आहेत.**

**– नितीन मुथ्था**
**नितीन कलेक्शन शिरुर**

पैठणीच्या संपूर्ण काठावर दोन्ही बाजूंनी एकसारखीच वेलबुट्टी दिसते, हे तिचे खास वैशिष्ट्य ! समृद्ध राजेशाही थाट, रेशमी दोऱ्याने कापडावर गुंफलेल्या आकृत्या ही तिची ओळख आहे. सध्याच्या काळात पैठणी साडीमध्ये विविधता आली आहे. बनारसी पैठणी, येवला पैठणी, बालगंधर्व पैठणी, डॉलर पैठणी, लोटस पैठणी, पेशवाई पैठणी... अशा वेगवेगळ्या प्रकारांमध्ये पैठणी उपलब्ध असल्याची माहीती शहरातील कापड दुकानदारांनी दिली.

## वाचकांच्या लेखणीतून

### अर्थ अक्षतांचा

गेल्या सोमवारी २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येतील राममंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या गाजावाजात आणि थाटामाटात साजरा झाला. अयोध्येत या सोहळ्याची शोभा वाढविण्यासाठी भाविक जनतेला आणि पैपाहुण्यांना निमंत्रणे जात होती. त्यासाठी निमंत्रण पत्रिका, मातीच्या पणत्या आणि साक्षात हळदीच्या ओल्या रंगाने माखलेल्या अक्षताही पाठविल्या गेल्या होत्या. ज्यांना या सोहळ्याला येणे शक्य होणार नाही त्यांनी आपल्या घरी किंवा आपल्या राहत्या परिसरात सार्वजनिकरीत्या प्रतीकात्मक सोहळा पार पाडावा अशीही व्यवस्था करण्यात आली होती.

काही लोक अक्षतांना अज्ञानापोटी अक्षदा असे म्हणतात. काही लोकांनी तर आपल्या कुटुंबातील मुलींची नावे अक्षदा असे ठेवल्याचेही आढळात आले आहे! म्हणून समाजात अक्षता हा शब्द अबाधित आणि शुध्द रूपात रहिला पाहिजे. त्यासाठी हा शब्दप्रपंच करीत आहे.

पूजेत मंत्रासह अक्षता देवाला अर्पित कराव्या लागतात.



अक्षताश्च सुरश्रेष्ठ कुंकमाक्ता: सुशोभिता: मया निवेदिता भक्त्या: गृहाण परमेश्वर।।

हे ईश्वरा, पूजेत कुंकवाच्या रंगाने सुशोभित अशा अक्षता मी तुला समर्पित करीत आहे. कृपा करून स्वीकार व्हावा.

अक्षत म्हणजे अ + क्षत = अक्षत. म्हणजे तुकडे न झालेले. खंडित किंवा तुकडे नसलेले. अखंडित किंवा अक्षत.

अक्षता शुभ आहेत. अशुभनिवारक आहेत. त्यांना आपल्या धार्मिक विधिविधानांत अनन्यसाधारण महत्त्व असते.

आपण पूजेप्रसंगी वा विवाहप्रसंगी साक्षात कुंकुम किंवा हळदीच्या ओल्या रंगाने माखलेले तांदूळ वापरतो. अशा प्रसंगी तांदूळ अखंड अथवा अक्षत असून मंत्रासहित उपयोगात आणतात. त्याला अक्षता म्हणतात.

ज्वारी किंवा तत्सम धान्यही अशा प्रसंगी वापरतात. पण या धान्यांना आतून कीड लागते. मात्र तांदळाला नाही. शिवाय आपल्या संस्कृतीत त्याला पवित्र आणि अशुभनिवारकही मानलेले आहे. म्हणूनच त्याचा अक्षता म्हणून वापर होतो.

**नाना ढवळे,** ८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# संस्कार हीच आयुष्यातील सर्वश्रेष्ठ शिदोरी!

**■ महेश ढमढेरे यांचे प्रतिपादन ■ आमदाबाद येथे राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर**




**शिरुर : प्रतिनिधी**

**संस्कार हीच आयुष्याची सर्वात मोठी शिदोरी असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कार जोपासणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन तळेगाव ढमढेरे ता. शिरूर येथील शिक्षण प्रसारक मंडळ व विद्या सहकारी बँकेचे विद्यमान संचालक महेशबापू ढमढेरे यांनी केले.**

आमदाबाद, ता. शिरूर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व तळेगाव ढमढेरे येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

आमदाबादच्या सरपंच सौ. सोनाली रेवणनाथ थोरात, शिरूर तालुका भाजपाचे अध्यक्ष आबासाहेब सोनवणे, मांडवगण फराटा येथील श्री. वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संचालक ज्ञानेश्वर उर्फ पिंटू फराटे पाटील, शिरूर तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष रामदास थोरात, शिरूर तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष सुनील शेलार, उद्योजक सतीश थोरात, आमदाबादचे माजी सरपंच पोपटराव घुले, उपसरपंच प्रदीप साळवे, आमदाबादच्या विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन नितीनअण्णा थोरात, माजी सरपंच बबनराव थोरात, तंटामुक्ती समितीचे उपाध्यक्ष अविनाशशेठ सोनार, मेजर भाऊसाहेब जाधव, ह. भ. प. नवनाथ माशेरे महाराज, रेवननाथ थोरात, अशोक माशेरे, उत्तमराव फराटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ घुले, ग्रामपंचायत सदस्य स्नेहलताई थोरात, आबासाहेब पवार, मुख्याध्यापिका सुनीता जगताप, सखाराम थोरात, सत्तूभाऊ थोरात, मंदा चौरे, मनोज गांधी, महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक नवले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ पाटील, प्रा . डॉ. संदीप सांगळे आदी मान्यवर याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री. महेशबापू ढमढेरे पुढे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्वत्र शिक्षण व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल होत आहेत. या बदलांकडे आव्हान म्हणून न पाहता संस्थाचालक, शिक्षक व विद्यार्थी या घटकांनी संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये शिक्षण व्यवस्था बळकट होणे गरजेचे असल्याचेही महेश बापू ढमढेरे यांनी सांगितले. कोणतेही व्यक्तिगत हित न पाहता तळेगाव ढमढेरे येथील शिक्षण प्रसारक मंडळ सातत्याने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून तळागाळातील विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी अहोरात्र प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शिरूर तालुका भाजपाचे अध्यक्ष आबासाहेब सोनवणे यांनी स्वयंसेवकांना श्रमप्रतिष्ठा जोपासण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे ही आजच्या युवकांसाठी खऱ्या अर्थाने पर्वणी असून जास्तीत जास्त युवकांनी यामध्ये सहभागी होण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी योग्य वयातच आपला बौद्धिक स्तर उंचावण्यासाठी आलेल्या संधीचा लाभ घेऊन समाज व देशाच्या उन्नतीसाठी आपले योगदान द्यावे असेही श्री .सोनवणे यावेळी म्हणाले.

मांडवगण फराटा येथील श्री. वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संचालक ज्ञानेश्वर उर्फ पिंटू फराटे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संघर्षातूनच कोणतेही व्यक्तिमत्व घडत असते याची जाण सातत्याने आजच्या युवकांनी ठेवण्याचे आवाहन श्री. फराटे पाटील यांनी केले. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास ही यशाची त्रिसूत्री असून जास्तीत जास्त युवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या अशा श्रमसंस्कार शिबिरांच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत जाण्याचा प्रयत्न करावा असे ते म्हणाले.

शिरूर तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष श्री. रामदास थोरात यांनी युवकांना आई-वडील व गुरुजनांचे ऋण कधीच विसरू नका असे आवाहन केले. आजच्या नव्या पिढीने ध्येयवेडे झाल्याशिवाय गत्यंतर नसल्याचेही ते म्हणाले. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून ग्राम विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास साधण्याचे आवाहन देखील श्री. रामदास थोरात यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या आमदाबाद येथील शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ह.भ.प. अशोक माशेरे महाराज, श्री. अविनाश सोनार, सरपंच सौ. सोनालीताई थोरात, आदी मान्यवरांनी आपापली मनोगते व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी प्रास्ताविक तर कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ पाटील यांनी आभारप्रदर्शन केले तर डॉ. दत्तात्रय कारंडे यांनी सूत्रसंचालन केले.

तळेगाव ढमढेरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या या सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप २५ जानेवारी रोजी होणार आहे. युवकांचा ध्यास - ग्राम व शहर विकास ही यंदाच्या शिबिराची प्रमुख संकल्पना असून शिबिर काळात ग्राम स्वच्छता अभियान, पर्यावरण जनजागृती, नव मतदार जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षारोपण, ग्राम सर्वेक्षण, शिवार फेरी, प्रौढ साक्षरता व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

# इंडिया आघाडीच्या निश्चित ३६जागांपैकी नगर राष्ट्रवादीकडे

**आमदार प्राजक्त तनपूरेंचे नाव लोकसभेसाठी आघाडीवर**

**नगर : प्रतिनिधी**



**राज्यातील ४८ लोकसभामतदारसंघात महाविकास आघाडीचे ३६ जागांवर एकमत झाले आहे, त्यातअहमदनगर लोकसभा मतदारसंघाची जागा आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेससाठी निश्चित झाल्याचेराष्ट्रवादीच्या गोटातून स्पष्ट करण्यात आले.**

त्यामुळे या मतदारसंघातउमेदवार निश्चितीसाठी चाचपणी पूर्णझाली असून ऐनवेळी शरद पवार गटकोणाला रिंगणात उतरवणार याकडेलक्ष लागले आहे. लोकसभा मतदारसंघातील जागावाटपाच्या मुद्द्यावर एकमत होईल की नाही ? याबाबत तर्क वितर्क लढवले जात होते. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना या आघाडीला जागा वाटपावर एकमत घडवण्यात काही अंश यश आले आहे.

त्यात राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघापैकी ३६ जागांवर एकमत झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सोलापूर येथे शनिवारी स्पष्ट केले. तसेच १३जागांवर चर्चा सुरू आहे. एकमतझालेल्या जागांची यादी अद्याप जाहीरनसली, तरी त्यात नगर लोकसभेचीजागा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच राहणार असल्याचे पक्षाच्या गोटातूनसांगण्यात आले.

आता उमेदवार आ. प्राजक्त तनपुरेंचे नाव आघाडीवर असले तरी अजित पवार गटाचे आ. नीलेश लंके हेच शरद पवार गटाचे उमेदवार असल्याची जोरदार चर्चा आहे. दरम्यान, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी एकमत झालेल्या ३६जागांपैकी १ जागा नगरची असून ती राष्ट्रवादीला असल्याचे स्पष्ट केले. जिल्ह्यातील शिर्डी लोकसभा मतदारसंघाची जागा काँग्रेसकडे जाणार की शिवसेना (उद्धव ठाकरे गट)लढवणार यावर अद्याप शिक्कामोर्तब झाले नाही.

# नाशिकमध्ये उद्धव ठाकरेंचं जंगी स्वागत

**काळाराम मंदिरात कुटुंबासह दर्शन**

**नाशिक : प्रतिनिधी**

**अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या भव्य मंदिराचे आज लोकार्पण झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिराचे लोकार्पण झाले. या कार्यक्रमाला अनेक दिग्गजांनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमाचे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनादेखील निमंत्रण देण्यात आले होते. पण उद्धव ठाकरे यांचा आज नियोजित नाशिक दौरा असल्याने ते अयोध्येला गेले नाहीत.**

आपण अयोध्येला मंदिराच्या उद्घाटनाला जाणार नाहीत, पण नंतर नक्की जाणार, असे उद्धव ठाकरेंनी याआधीच स्पष्ट केले होते. तसेच अयोध्येला २२ जानेवारीला राम मंदिर लोकार्पणाच्या दिवशी आपण काळाराम मंदिरात दर्शनाला जाणार असल्याचं ठाकरेंकडून स्पष्ट करण्यात आलेलं. त्यानुसार उद्धव ठाकरे यांनी आज सहकुटुंब नाशिकच्या काळाराम मंदिरात श्रीरामांचे दर्शन घेतले.

नाशिकच्या काळाराम मंदिरात उद्धव ठाकरे यांनी सपत्निक पूजा केली. यावेळी पुजाऱ्यांकडून मंत्रोच्चार करण्यात आला. अतिशय मनोभावे श्रीरामांची पूजा करण्यात आली. यावेळी मंदिराच्या गाभाऱ्यात युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, त्यांचा भाऊ तेजस ठाकरे आणि खासदार संजय राऊत हे देखील उपस्थित होते. उद्धव ठाकरे आज नाशिकमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं. नाशिकच्या काळाराम मंदिरात त्यांचा सत्कार करण्यात आला. उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब काळाराम मंदिरात पूजा केली. त्यानंतर काळाराम मंदिरात आरती करण्यात आली.

(पान १ वरून)

# आजपासून कालचक्र बदललं.. राम मंदिर उभारलं, आता पुढे काय?

अनेकांनी या तपस्येमध्ये कष्ट घेतलेले आहे. आजची वेळ उत्सवाचा सण आहेच.. पण यासोबतच हा क्षण भारतीय समाजाच्या परिपक्वतेच्या बोधाचा क्षण आहे. ही वेळ विजयाची नाही तर विनयाची आहे. जगात असे अनेक देश आहेत, ज्यांना त्यांच्या इतिहासामुळे नुकसान सहन करावं लागलं होतं. परंतु आमच्या देशाने इतिहासाच्या या प्रश्नाला गांभीर्याने आणि भावूकतेने सामोरं जाण्याचा निर्णय घेतला.

मोदी म्हणाले, काही लोक म्हणायचे, राम मंदिर बनलं तर आग लागेल. पण हे लोक भारताच्या व्यवस्थेला समजू शकलेले नाहीत. हे मंदिर समन्वयाचं प्रतिक आहे. हे निर्माण कोणत्या आगीला नाही तर उर्जेला जन्म देणार आहे. मी त्या लोकांना आवाहन करतो, या विचार करा. राम आग नाही ऊर्जा आहे, राम विवाद नाही तर राम समाधान आहे, राम केवळ एकाचे नाही तर सगळ्यांचे आहेत. राम केवळ वर्तमान नाही तर अनंतकाळ आहे.

हे मंदिर केवळ एक देवाचं मंदिर नाही तर भारताच्या संस्कृतीचं, चेतनेचं, ऊर्जेचं स्थळ आहे. राम भारताचा विचार आहेत तर राम भारताचं विधान आहे. जेव्हा रामाची प्रतिष्ठा होते तेव्हा त्याचा प्रभाव हजारो वर्षे होत असतो.

श्रीरामांचं भव्य मंदिर बनलं आता पुढे काय? असा प्रश्न विचारला जातो. आजच्या या वेळेवर जे दैवी आत्मे आशीर्वादासाठी उपस्थित झालेले आहेत. त्यांना असंच विदा करता येणार नाही. आज मी पवित्र मनाने अनुभव घेतोय की, कालचक्र बदलत आहे. आपल्या पिढीला त्यासाठी निवडलं गेलं आहे. हजारो वर्षांनंतर पिढ्या राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला लक्षात ठेवणार आहे. त्यामुळे मी म्हणतो हीच ती वेळ योग्य वेळ आहे. या पवित्र वेळेपासून आपल्याला एक हजार वर्षांची जाणीव ठेवायची आहे. मोदी म्हणाले, इथून पुढे आपल्याला भव्य दिव्य सक्षम भारताच्या निर्मिताची शपथ घ्यावी लागले. आपल्या अंतःकरणाला विस्तारित करावं लागेल. देवापासून देशापर्यंत आणि रामापासून राष्ट्रापर्यंत आपल्याला विचार करावा लागेल.

### पारनेर तालुका श्रीराममय!

भाळवणी यासह सर्वच गावातील मुख्य मंदिरात महाआरतीच्या आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यासाठी संपूर्ण पारनेर तालुकाच भगवामय झाला होता तसेच सर्वच गावातील मुख्य मंदिरांनी महाआरतीच्या आयोजन करून महाप्रसाद तसेच मिरवणुका काढण्यात आल्या संपूर्ण तालुक्यातच लोकांनी दिवाळी सारखे सडा रांगोळ्या व भगवे झेंडे लावून श्रीराम प्रतिष्ठेचे स्वागत केले.

# श्रीरामाच्या जय घोषांनी निघोज नगरीत आनंदी आनंद

## स्क्रिनवर प्रेक्षपण करीत साकारली अयोध्या नगरी



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज परिसरात जय राम श्रीराम जय जय राम या जय घोषांनी निघोज नगरीत आनंदी आनंद ! अयोध्या येथील श्रीराम प्रतिष्ठापना कार्यक्रम मोठ्या स्क्रीनवर दाखवीत निघोजमध्ये अयोध्या नगरी साकारली होती.**

सकाळी सात ते नऊ मांडवडहाळे, ८ ते १० होमहवन, सकाळी दहा ते ११.३० पुणे येथील मिलींदजी वायकर यांचे प्रवचन, ११.३० ते १२.३० अयोध्या नगरीतील श्रीराम प्राणप्रतिष्ठापणा थेट प्रक्षेपण, दुपारी १२ ३० ते १ महाआरती, दुपारी १ वाजता महाप्रसाद, सायंकाळी सहा ते आठ दिपोत्सव तसेच या आनंद प्रित्यर्थ फटाक्यांची आतषबाजी अशाप्रकारे दिवसभर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकाळी तब्बल दोनशे पेक्षा जास्त ग्रामस्थांनी श्रीराम मंदिर येथे मांडवडहाळे आणून कार्यक्रमाची सुरुवात केली.

यावेळी प्रभू रामचंद्र यांच्या मुर्तीला अभिषेक करण्यात आला होता यावेळी श्रीराम मंदिरात भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. त्यानंतर मळगंगा मंदिरासमोरील जागेत मंडपामध्ये होमहवण करण्यात आला होता. अयोध्या येथील श्रीराम प्रतिष्ठापना कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पहाण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. त्यांनंतर झालेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. सकाळी दहा ते अकरा या दरम्यान ज्ञानोदय कोचिंग क्लासेस या विद्यार्थ्यांनी काढलेल्या श्रीराम दर्शन या मिरवणुक सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

विद्यार्थ्यांनी यावेळी प्रभू रामचंद्र, हनुमान सिता देवी आदी वेशभूषा परिधान करीत सवाद्य मिरवणूक काढली होती यावेळी ज्ञानोदय कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे ग्रामस्थांनी व भावीकांनी कौतुक केले. सकल हिंदू समाज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ, मंळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, प्रभू रामचंद्र महाराज सेवा समिती निघोज यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. निघोज येथील महिला भगिनी यांनी पहाटे उठून अंगण स्वच्छ केले रांगोळी काढली.दिवाळीसारखा पहाटे दिपोत्सव साजरा करीत निघोज व परिसरात या प्राणप्रतिष्ठापणा सोहळ्याचे जोरदार स्वागत केले.

# लढेंगे और जितेंगें, हम सब जरांगे!

## जोरदार घोषणाबाजीत मराठ्यांचं वादळ नगरमधून मुंबईकडे रवाना

**नगर : प्रतिनिधी**

**एक मराठा, लाख मराठा, जय भवानी जय शिवाजी, लढेंगे और जितेंगे, हम सब जरांगे, अशा एक ना अनेक घोषणा देत, मनोज जरांगे पाटील यांच्या समवेत असंख्य मराठा समाजबांधव महिला, युवकांनी आज सोमवार (ता. २२) सकाळी नगरमधून मुंबईच्या दिशेने प्रस्थान केले.**



मराठा आरक्षणासाठी सुरू असलेला लढा आता अंतरवाली सराटी (ता.अंबड) येथून मुंबईतील आझाद मैदानापर्यंत पोहोचणार आहे. गळ्यात कवड्याची माळ, भगवा रुमाल, पांढरे शुभ्र कपडे परिधान केलेल्या जरांगे पाटील मोर्चाचे नेतृत्त्व करत होते. त्यानंतर विविध घोषणा देत नगर येथून पायी रॅली मुंबईच्या दिशेने निघाली. नगर येथील महिलांनी मनोज जरांगे पाटील यांचे औक्षण केले.

जरांगे पाटलांसह असंख्य मराठा बांधव व महिला या पदयात्रेत सहभागी झाल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वरूढ पुतळा, मराठा बांधवाच्या डोक्यावर भगव्या टोप्या, हातात भगवे झेंडे होते. मराठा आंदोलक विविध घोषणा देत असल्याने महामार्ग व परिसर दणाणून गेला होता.

मनोज जरांगे पाटील यांची पदयात्रा बाराबाभळी येथून सोमवारी सकाळी निघाली. भिंगार शहर, स्टेट बँक चौक, चांदणी चौक, माळीवाडा, स्वस्तिक चौक, सक्कर चौक ते केडगाव मार्गे पुण्याकडे जाणार आहे. पदयात्रेत मोठ्या संख्येने सकल मराठा बांधव सहभागी झाले आहेत. त्यामुळे कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी पदयात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात होता. पोलीस व स्वयंसेवक वाकीटॉकीद्वारे एकमेकांच्या संपर्कात होते.

# मिंडा कंपनी ते बाबुर्डी रस्त्याचे काम निकृष्ट

## बाबुर्डी ग्रामस्थांनी काम केले बंद



**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा नवीन औद्योगिक वसाहतीमधील मिंडा कंपनी ते बाबुर्डी रस्त्याचे चालू असलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे केले जात असून बुधवार दि. १७ रोजी मनसेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रविश रासकर व बाबुर्डीचे ग्रामस्थ यांनी काम बंद पाडले.**

मिंडा कंपनी ते बाबुर्डी रस्ता अतिशय खराब झाला होता. ग्रामस्थांच्या मागणीनुसार आमदार नीलेश लंके यांनी या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. या रस्त्यावर पाणी, डांबर कमी प्रमाणात वापरले जात असून पाहिजे त्या प्रमाणात रोलिंग केले जात नाही. रस्त्याच्या साईडपट्टीवर मुरमा ऐवजी मातीचा वापर केला जात असल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले व काम बंद पाडले.

यावेळी मनसे पारनेर तालुका उपाध्यक्ष रविश रासकर, बाबुर्डीचे सरपंच प्रकाश गुंड, गणेश दिवटे चेअरमन, मुकेश गवळी शिवसेना विभागप्रमुख, लाला भोंडवे, किशोर लगड मेजर, अमोल लगड, शाम लगड, रणजित दिवटे पाटील, एकनाथ जगताप, दादा गारकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी काम थांबवून जोपर्यंत काम व्यवस्थीत केले जात नाही तोपर्यंत काम थांबवावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

# श्री समर्थ ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी राबवले स्वच्छता हिच सेवा अभियान!

**पारनेर : प्रतिनिधी**

**श्री समर्थ अकॅडेमी संचालित श्री समर्थ पॉलीटेकनिक व श्री समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी २२ जानेवारी रोजी अयोध्या येथे होणाऱ्या प्रभु श्री रामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठेच्या पार्शवभूमीवर म्हसणे गाव व पळवे येथील मंदिरांची साफ सफाई केली.**



या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक शिक्षणाचे धडे मिळाले तसेच परिसर स्वच्छ ठेवणे ही गोष्ट वैयक्तिक व सामूहिक दृष्टीने खूप महत्त्वाची आहे या परिसराचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत असतो. म्हणून परिसर स्वच्छतेमध्ये लोकांना योग्य व पुरेसा आहार, शुद्ध पाणी, वैयक्तिक स्वच्छते इतकेच परिसर स्वच्छतेला महत्त्व आहे हा संदेश मिळाला. भारतीय जनतेचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि बौद्धिक कल्याण हे नितांत आवश्यक आहे हे लक्षात आले आहे. हे आपल्या देशाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीला खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देण्यासाठी आहे.

ज्याची सुरुवात सर्वत्र स्वच्छता आणून केली जाऊ शकते हा विचार समर्थ अॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी या छोट्याशा उपक्रमातून प्रस्थापित केला. श्री समर्थ पॉलीटेकनिक व श्री समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या श्रमदानातून गावातील मंदिरे साफ करून सामाजिक कार्याला हातभार लावून समाजापुढे एक आदर्श घालून दिला आहे.

संस्थापक कैलास गाडीलकर यांच्या संकल्पनेतून सदर कार्यक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य देसले यांनी मुलांना मार्दर्शन करताना आपण कुठल्याही क्षेत्रात जरी असले तरी स्वच्छतेचे पालन सर्वांसाठी आवश्यक आहे विचारांची स्वच्छता आपल्याला एक चांगला व्यक्ती बनवते, व्यक्तिगत स्वच्छता आपल्याला रोगापासून वाचवते. आणि सामाजिक स्वच्छता एक सशक्त समाज घडवते असे प्रतिपादन संस्थेच्या संचालिका सौ. शिल्पा कैलास गाडीलकर यांनी केले व सर्व उपस्थित म्हसणे व पळवे ग्रामस्थांचे आभार मानले या प्रसंगी श्री समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूलचे प्राचार्य देठे सर आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून श्रमदानास हातभार लावला.

# मराठा समाजाचे घरोघरी जाऊन होणार सर्वेक्षण

## राज्य मागासवर्ग आयोगाला निर्देश

**नगर : प्रतिनिधी**

**राज्य मागासवर्ग आयोगाच्या आदेशानुसार नगर शहरात २३ ते ३१ जानेवारीपर्यंत मराठा कुटुंबीयांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जाणार आहे. या कामासाठी ७५२ प्रगणक व ६४ परिवेक्षक अशा एकूण १६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना नुकतेच महापालिकेत प्रशिक्षण देण्यात आले.**




यावेळी आयुक्त तथा प्रशासक डॉक्टर पंकज जावळे, उपायुक्त अजित निकत, सचिन बांगर आदी उपस्थित होते. राज्य सरकारने मराठा समाजाचेमागसलेपणा तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाला निर्देश दिले होते. त्यानुसार आयोगाने शैक्षणिक सामाजिक व आर्थिक स्तरावर निकष ठरवले आहे. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या १५४ प्रश्नांचा समावेश असलेल्या एका प्रश्नावलीतून घरोघरी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्येकी दीडशे ते दोनशे घरांसाठी एका प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. नगर शहरात सुमारे एक लाख ४० हजार कुटुंबे राहतात.

नियुक्त केलेले कर्मचारी प्रत्येक घरी जाऊन माहिती घेत, मराठा कुटुंबांची माहिती सॉफ्टवेअरमध्ये संकलित करणार आहेत.

# वैभव पडवळ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात नववा

## गटविकास अधिकारीपदी नियुक्ती

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील वैभव बाळासाहेब पडवळ याने मागच्या दोन वर्षांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहा पोस्ट उत्तीर्ण केल्या.२०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत गटविकास अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.**

२०२२ उपजिल्हा निबंधक वर्ग एक पुणे येथे नियुक्ती झाली.पण मनात पोलिस अधिकारी होण्याची जिद्द झोपु देत नव्हती.२०२३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात नवव्या क्रमांकाने डीवायएसपी पदी उत्तीर्ण होऊन एक नवीन आदर्श ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर घालून दिला. तसेच स्टेट टॅक्स इन्स्पेक्टर, पोलीस उपनिरीक्षक, मंत्रालय कक्ष अधिकारी याही परीक्षेत राज्याच्या गुणवत्ता यादीत क्रमांक मिळविला आहे.

सध्या वैभव पडवळ हा पुणे जिल्ह्यात उपनिबंधक पदावर वयाच्या २३ व्या वर्षी पोलीस उपाधीक्षक होण्याचा मान मिळविला.वडील बाळासाहेब पडवळ आणि आई संगीता पडवळ यांच्यासाठी आज सोनेरी दिवस असल्याचे वैभवने सांगितले.वैभवच्या यशाबद्दल आमदार नीलेश लंके , जितेश सरडे तसेच अनेक मान्यवर व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे.

# कडूस शाळेतील वेदिका काळेचा तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक

## दमदार शब्दफेकीला उपस्थितांची दाद

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील पानोली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या तालुका स्तरावरील विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा पार पडल्या. तालुक्यातील प्रत्येक केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवलेले स्पर्धक तालुका पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाले होते. वक्तृत्व स्पर्धेच्या बालगटात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडूस शाळेची इयत्ता चौथीची विद्यार्थिनी वेदिका योगेश काळे हिने ''माझी मैत्रीण'' या विषयावर आपले भाषण सादर केले.**



दमदार सुरुवात, खडा आवाज, उत्कृष्ट संवादफेक आणि समर्पक शेवट या गोष्टीमुळे सदर भाषणाला तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळाला असून सदर भाषणाची जिल्हा पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या भाषणाची तयारी मुख्याध्यापक चंद्रकांत गोसावी, पोपट भुजबळ, वर्गशिक्षक भाऊसाहेब गवळी, सखाराम साठे व गंगाधर भालेराव या शिक्षकांनी करून घेतली होती.

वेदिकाच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सीमा राणे, विस्ताराधिकारी विनेश लाळगे, केंद्रप्रमुख चांगदेव गवळी, जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे संचालक कारभारी बाबर, सूर्यकांत काळे, कडूसचे सरपंच मनोज मुंगसे, उपसरपंच छाया रावडे, ग्रामपंचायत सदस्य नारायण नरवडे, राष्ट्रवादी युवती तालुकाध्यक्ष पूनमताई मुंगसे, माजी सरपंच मीनाताई मुंगसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप दिवटे, उपाध्यक्ष सुनील मुंगसे, दादासाहेब मुंगसे, ग्रामविकास अधिकारी आश्लेषा ताजने यांनी अभिनंदन केले आहे.

# संदीप पाटील वराळ यांच्या हत्येच्या निषेधार्थ निघोजकरांनी पाळला काळा दिवस

## ग्रामस्थांच्या वतीने कँडल मार्च ■ मान्यवरांकडून श्रद्धांजली अर्पण

**निघोज : प्रतिनिधी**

**रविवारी निघोज येथील एसटी बस स्थानक परिसरात माजी सरपंच व बाजार समितीचे माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांची अमानुष हत्या करण्यात आली त्या निषेधार्थ निघोज ग्रामस्थ गेली सात वर्षे काळा दिवस पाळीत हल्लेखोरांचा निषेध करीत असतात. रविवार दि. २१ रोजी सकाळी सात ते बारा वाजेपर्यंत निघोज येथील व्यवसायिकांनी स्वयंस्फूर्तीने बंद पाळला.**



दिवसभर संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन कार्यालयात संदीप पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत गावकऱ्यांनी व तालुक्यातील संदीप पाटील प्रेमी मित्रांनी येऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच सायंकाळी सात वाजता निघोज ग्रुप ग्रामपंचायत, संदीप पाटील चौक, नवी पेठ मार्गे एस टी बस स्थानक तसेच मंळगंगा मंदीर ते पुन्हा जुनी पेठ अशाप्रकारे ग्रामस्थ व कार्यकर्ते यांनी कँडल मार्च काढीत तसेच संदीप पाटील अमर रहे, परत या परत या संदीप पाटील परत या अशा घोषना देत कँडल मार्च काढला होता.

यावेळी ग्रामपंचायत चौकात त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पंचायत समितीचे सदस्य दिनेश बाबर, पंचायत समितीचे सदस्य अमोल साळवे, कान्हूरपठारचे सरपंच किरण ठुबे, वडनेरचे सरपंच राहुल सुकाळे, उपसरपंच माऊली वरखडे, कैलास कोठावळे, टाकळी ढोकेश्वर उपसरपंच रामभाऊ तराळ, निघोज सोसायटीचे माजी चेअरमन अनंतराव वरखडे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे माजी उपाध्यक्ष संतोषशेठ ईधाटे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, शहराध्यक्ष योगेश खाडे, आनंद भुकन, खजिनदार विजयजी रासकर, सहसचिव अविनाश भांबरे, पत्रकार संदीप ईधाटे, प्रेस फोटोग्राफर जयसिंग हरेल, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे मार्गदर्शक सुनिल पवार, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील , निलेश घोडे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त भास्करराव वराळ, देवराम लामखडे, देवराम वराळ, अल्पसंख्याक समाजाचे नेते व संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका प्रवक्ते अस्लमभाई इनामदार, अल्पसंख्याक समाजाचे युवा नेतृत्व मनोज ईधाटे, स्वप्नील आतकर आदींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महिला भगीनी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com